ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १९ पुणें, बुधवार तारीख २८ जानेवारी, १९५३ अंक ४

## विविध माहिती

**राज्यारोहणाच्या स्मरणासाठीं रुमाल**—एलिझाबेथ राणीच्या राज्यारोहणाचें स्मरण म्हणून एका डॅनिश कंपनीनें राणीचें चित्र असलेले एक लाख रेशमाचे हातरुमाल तयार करण्याचें काम अंगावर घेतलें आहे. हे हातरुमाल कॅनडासाठीं बनविण्यांत येत आहेत. हें काम पुरें झाल्यावर द. आफ्रिका, ऑस्ट्रेलिआ आणि ब्रिटन ह्या राष्ट्रांसाठीहि तसेच रुमाल करण्यांत येणार आहेत.

**भारताला जपानची देणगी**—भारताच्या आरोग्यमंत्री ह्यांनीं दिल्ली येथें जपानकडून आलेल्या एका देणगीचा स्वीकार केला. ही देणगी म्हणजे महारोगावर गुणकारी ठरलेलें एक औषध आहे. जपानच्या लोकसभेच्या एका सभासदानें औषधाची पेटी जपानहून आणली होती.

**दीपगृहांची व्यवस्था**—भारताच्या किनाऱ्यावरील दीपगृहांच्या बाबतींत सल्ला देणाऱ्या कमिटीची बैठक नुकतीच दिल्ली येथें भरली होती. भटकळ आणि द्वारका येथील दीपगृहावरून धुक्याची सूचना देण्याची व्यवस्था करण्याचें कमिटीनें ठरविलें. कोचीन बंदरांत अधिक जोरदार रेडिओ-किरणांची व्यवस्था करण्याचें ठरलें. भारतामधील बंदरांची सुधारणा करण्यासाठीं दर टन आयातीमागें ३ आणे वसूल करण्यांत यावे अशी सूचना करण्यांत आली.

**पोर्तुगाल सरकारला कर्ज**—अमेरिकेच्या आयात-निर्यात बँकेनें पोर्तुगालच्या सरकारला १·७ कोटी डॉलर्सचें कर्ज मंजूर केलें आहे. द. ऱ्होडेशिआंतील खनिजांच्या खाणींचा बंदराशीं संबंध जोडण्यासाठीं, रेल्वेचे रस्ते बांधण्यासाठीं कर्जाचा विनियोग करण्यांत यावयाचा आहे. द. ऱ्होडेशिआंत तांबें, कोबाल्ट व क्रोमिअम ह्या धातूंच्या खाणी असून त्यांच्या वहातुकीसाठीं रेल्वे-रस्ते उपलब्ध नाहींत.

**पोस्ट-मास्टर जनरलसची बैठक**—भारतामधील पोस्ट-मास्टर्स जनरलसची बैठक ११ फेब्रुवारी रोजीं दिल्लीला भरणार आहे. बैठकींत पोस्ट खात्याच्या पंचवार्षिक कार्यक्रमाची चर्चा होणार आहे. त्याशिवाय खेडेगांवांतील पत्रांच्या बटवड्याची सुधारणा, हिशोबाचें विकेंद्रीकरण, टेलिग्राफ व टेलिफोन्स ह्या सोयींचा विस्तार इत्यादि विषयहि चर्चिले जाणार आहेत.

**अमेरिकेला सल्ला**—ब्रिटनमधील बार्क्लेज बँकेचे अध्यक्ष मि. अँथनी टक ह्यांनीं अमेरिकेनें परदेशांपासून अधिक प्रमाणांत माल खरेदी करावा असा सल्ला दिला आहे. त्याचप्रमाणें अमेरिकेसारख्या धनको राष्ट्रांनीं मागासलेल्या राष्ट्रांत भांडवल गुंतविण्यास पुढें आलें पाहिजे, असेंहि मत त्यांनीं व्यक्त केलें आहे.

**भारताचें देणें भागविलें**—युद्धकाळांत ब्रिटिश सरकारनें भारतीय बोट-कंपन्यांच्या बोटी सक्तीनें ताब्यांत घेतल्या होत्या. त्यासंबंधीं नुकसान भरपाई मिळावी म्हणून भारतीय सरकारनें ब्रिटनच्या सरकारकडे मागणी केली होती. ह्या मागणीचा अखेरचा हप्ता म्हणून ब्रिटिश सरकारनें ६ कोटी रुपये दिले असें समजतें.

**उत्तर-प्रदेश सरकारची आज्ञा**—उत्तर-प्रदेश सरकारनें राज्यांतील लोकलबोर्डांना असें फर्माविलें आहे कीं त्यांनीं अनावश्यक खर्च थांबवून आपल्या अंदाजपत्रकाची तोंडमिळवणी करावी. ज्या योजनांच्या खर्चाची तरतूद अंदाजपत्रकांत करण्यांत आली नसेल, त्या योजनांना सरकार कर्ज देणार नाहीं असेंहि कळविण्यांत आलें आहे.

**जुन्या पद्धतीहि उपयोगांत येतात**—अमेरिकेंत गुरांच्या कळपांची जोपासना करणारे शेतकरी पुष्कळदां हमरस्त्यापासून फार दूर रहातात. अशा एका शेतकऱ्याचा मुलगा फार आजारी असल्यानें त्याला इस्पितळांत ठेवण्यांत आलें. पण मुलाच्या बापाला त्याच्या प्रकृतीची वार्ता कशी कळणार? ह्या कामीं मुलाच्या आईनें घरीं पाळलेलीं कबुतरें लावलीं. इस्पितळांतून रोज एकादें पाळीव कबूतर चिठी बांधून शेताकडे सोडण्यांत येई.

**सोन्यावरील विक्रीकर**—हैदराबाद राज्यांत सोनें आणि चांदी ह्यांच्या विक्रीवरील कराचे दर कमी करण्यांत आले आहेत. पूर्वी हा कर शंभर रुपयांवर २ रुपये घेण्यांत येत असे. तो आतां अवघा ४ आणे घेण्यांत येणार आहे असें समजतें. तो एकदाच घेतला जाईल.

**बिहारमध्यें चुनखडीच्या खाणी**—बिहारमधील हजारीबाग जिल्ह्यांत पोर्टलंड सिमेंटच्या कारखान्याला उपयोगी पडेल अशा चुनखडीच्या दगडाच्या खाणी सांपडल्या आहेत. खाणींत ३० लाख टन चुनखडी सांपडेल असा अंदाज करण्यांत आला आहे. भारतीय सरकारच्या जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिआनें हा शोध लावला आहे.

**पोस्ट खात्यास आलेली नुकसानी**—१९५१-५२ मध्यें हिंदी पोस्ट-तार खात्यानें, मनिऑर्डरी व इन्शुअर्ड वस्तू हरविल्याबद्दल लोकांना ३,२९,००० रु. नुकसानभरपाई दिली. ट्रंक कॉलच्या चार्जेसच्या पायीं सरकारचे ११,००० रु. बुडाले व पोस्टल नोकरांच्या अफरातफरींमुळें १ लक्ष रु. गेले. खेडेगांवांतील पोस्ट ऑफिसांसाठीं २० लक्ष रुपये नुकसान सोसावें लागलें.

**मसाल्याच्या पदार्थांची निर्यात**—१९५०-५१ सालीं भारतानें २५·१० कोटी रुपये किंमतीचे मसाल्याचे पदार्थ निर्यात केले होते. १९५१-५२ सालची निर्यात ३०·२९ कोटी रुपये किंमतीची झाली. १९५१-५२ सालीं भारतानें १,२६,७९,००० पौंड वजनाची तंबाखू निर्यात केली. तिची किंमत सुमारें २,१२,४७,००० रुपये झाली.

**"अरबराष्ट्रांना युद्धसाहित्य पुरवूं नका"**—ग्रेट ब्रिटन अरब राज्यांना जेट विमानें पुरवीत आहे, त्याबद्दल इस्रांएल सरकारनें तीव्र नापसंति व्यक्त केली आहे.

**अमेरिकेंत शर्यतींची चलती**—घोड्याच्या शर्यतींस १९५२ वर्ष अमेरिकेंत फार चांगलें गेलें. २,८८,४९,४५१ लोकांनीं शर्यती पाहिल्या. १९५१ चे मानानें हा आकडा २८,००,००० नें जास्त आहे. १९६ कोटी डॉलर्स इतके पैसे शर्यतींवर लावण्यांत आले, १९५१ मध्यें १९६ कोटी डॉलर्स शर्यतींवर लावण्यांत आले होते.

**अल्मोरा भागांत वीजकेंद्रें**—अल्मोरा (उत्तर प्रदेश) जिल्ह्यांत समाजविकास योजनांचा भाग म्हणून जलनिर्मित विजेचीं दोन केंद्रें उभारण्याचें सरकारनें ठरविलें आहे. दोन्ही केंद्रांच्या जागांची पहाणी पूर्ण झाली आहे.

**पोस्ट-खात्याचा व्याप**—१९३८-३९ सालीं भारत अविभक्त असतांना पोस्ट व टेलिग्राफ खात्यानें १२४·१ कोटी पोस्टल आर्टिकल्सची ने-आण केली होती. १९५१-५२ सालीं २३१·८ कोटी वस्तूंची ने-आण करण्यांत आली.

**व्होल्टेअरच्या पत्रांचा संग्रह**—१८ व्या शतकांतील प्रसिद्ध क्रांतिकारक फ्रेंच ग्रंथकार व्होल्टेअर ह्यानें लिहिलेलीं ३०,००० पत्रें मि. बेस्टरमन नांवाच्या इंग्लिश चरित्रकारानें जमविलीं आहेत. ह्या पत्रांचें इंग्रजींत भाषांतर करून तीं सटीक प्रसिद्ध करण्याचा त्यांचा विचार आहे. पत्रव्यवहाराचे ६० खंड होतील; त्यांपैकीं पहिले तीन खंड लवकरच प्रसिद्ध होतील. आतांपर्यंत फक्त १८,००० पत्रेंच प्रसिद्ध करण्यांत आलीं आहेत, आणि तींहि फ्रेंच भाषेंत.

**ब्रिटन व जपान ह्यांचा व्यापार**—जपान व ब्रिटन ह्यांच्या दरम्यान टोकिओ येथें लवकरच व्यापार-विषयक वाटाघाटी सुरू होणार आहेत. पौंडी गटांतील देशांनीं आयातीवर बंधनें घातलीं असल्यानें जपानचा व्यापार पडला आहे असें जपानचें मत आहे. अलीकडे पौंडाची स्थिती सुधारल्यामुळें ब्रिटन वाटाघाटीस तयार झालें असावें असा अंदाज करण्यांत येत आहे.

**तूप खाण्यांत पहिला नंबर**—भारतीय संघराज्यांत तुपाच्या दरमाणशीं खपाचें वार्षिक प्रमाण अजमीर राज्यांत सर्वांत अधिक आहे. तेथें तूप खाण्याचें दरमाणशीं वार्षिक प्रमाण ६ पौंड आहे. आसामचा अनुक्रम ह्या बाबतींत सर्वांत खालीं लागतो. आसाममध्यें दरवर्षीं दरडोई अवघ्या अर्ध्या पौंड तुपाचा खप होतो.


दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

किर्लोस्कर

आमच्या वसंत नं. १ शरद वगैरे पॉवर चरकांच्या मालिकेंत नवीन 'कोयना' चरकाचें आगमन. कमी पॉवर लागत असल्यानें भांडवलांत बचत झाली आहे.




विशेष माहितीसाठीं लिहा—

किर्लोस्कर बंधु लि., किर्लोस्करवाडी (दं. सातारा)

दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

( शिड्यूल्ड बँक )

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग

पुणें २.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. | १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. | ७,१९,४८५ |
| खेळतें भांडवल | रु. | ७५,००,००० |

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. द्वा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.

श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर.

# अर्थ

बुधवार, ता. २८ जानेवारी, १९५३



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## औद्योगिक विकासास शेतीच्या उत्पादन वाढीचें महत्त्व

### सर जॉर्ज शूस्टर ह्यांचा हितावह सल्ला

भारतांत उद्योगधंदे लवकर वाढले पाहिजेत, म्हणजे आर्थिक प्रश्न सुटण्यास मदत होईल; पंचवार्षिक योजनेंत शेतीवर भर देण्यांत आला आहे तो गैरवाजवी आहे; शेतीच्या अर्थव्यवस्थेवर आधारलेली समाजरचना लष्करी संरक्षणास क्षम होणार नाहीं, इत्यादि मुद्दे वारंवार मांडले जातात. तथापि, शेती व कारखानदारी ह्यांचें नातें कोणत्या स्वरूपाचें आहे, त्यांची एकमेकांची वाढ कशी एकमेकांवर अवलंबून आहे आणि त्यांपैकी कोणास व किती प्राधान्य दिलें पाहिजे ह्याचा उहापोह जसा व्हावयास पाहिजे, तसा तो झालेला आढळत नाहीं. ह्या दृष्टीनें, सर जॉर्ज शूस्टर ह्यांनीं पंचवार्षिक योजनेवरील त्यांचें मत व्यक्त करतांना मद्रास येथील भाषणांत जे उद्गार काढले, ते अत्यंत मननीय आहेत:—

" पुरेसें शेतीचें उत्पादन झाल्याविना भारताची औद्योगिक वाढ योग्य रीतीनें होणें अशक्य आहे. शेतीच्या उत्पादनाचा पाया मजबूत झाल्यावरच उद्योगधंद्यांच्या वाढीची गति सुधारतां येईल. पहिल्या पांच वर्षांत, शेतीची वाढ मोठ्या प्रमाणावर करण्यांत यावी आणि उद्योगधंद्यांच्या वाढीची पूर्वतयारी करण्यांत यावी. आज कारखान्यांत काम करणाऱ्या कामगारांची संख्या २५ ते ३० लक्ष आहे. हिंदी आर्थिक जीवनांत उद्योगधंद्यांमुळें सुधारणा घडवून आणावयाची असेल, तर कामगारांची संख्या त्याच्या दसपट तरी झाली पाहिजे. तीन कोटी लोकांना कारखान्यांत काम मिळालें तरी एकूण लोकसंख्येच्या मानानें ही संख्या अत्यल्पच ठरेल. तेव्हां, औद्योगीकरणाच्या आवश्यकतेच्या तीव्रतेबद्दल प्रश्नच नाहीं. पण, ह्या कारखानदारीस बाजारपेठ कशी मिळावयाची, ही महत्त्वाची अडचण आहे. भारताच्या उत्पादनास परदेशांत मोठें गिऱ्हाईक मिळण्याची शक्यता दिसत नाहीं. तयार माल भारतांतच मुख्यतः खपावा लागेल. म्हणजे, भारतांतील लोकांची क्रयशक्ति सुधारली पाहिजे, आणि ही क्रयशक्ति शेतीच्या व्यवसायांतील लोकांवरच अवलंबून रहाणार. ह्या बहुसंख्य लोकांची क्रयशक्ति सुधारल्यानंतरच मोठ्या प्रमाणावर औद्योगीकरण हातीं घेतां येणार. ह्या साध्या गोष्टीचें प्रत्यंतर म्हणजे कापडाच्या गिरण्यांना आजच त्यांचें कापड खपविण्यास अडचण पडत आहे. दुसरी महत्त्वाची एक गोष्ट अशी, कीं दोन-तीन वर्षांत यंत्रसामुग्रीच्या किंमती उतरतील तोंपर्यंत वाट बघणें हितावह ठरेल. " सिंद्रीच्या कारखान्यांतील खताच्या विक्रीस पडत असलेली अडचणहि हेंच सांगत आहे, आणि श्री वैकुंठराय मेहता ह्यांनीं " अर्था "स दिलेल्या संदेशांत शेतीच्याच विकासास अग्रस्थान दिलेलें आहे.

सर जॉर्ज शूस्टर ह्यांनीं, भारतांतील लोक बडबड फार करतात, पंचवार्षिक योजनेंतील तपशीलाची टीका करीत बसतात, परंतु स्वतः कांहींच करीत नाहींत हें स्पष्ट बोलून दाखविलें. फोर्ड फौंडेशन करीत असलेल्या प्रकारची मदत करण्यास एकहि उद्योगपति पुढें येत नाहीं, ही गोष्ट काय दर्शविते ! कांहीं श्रीमान् व्यापारी एकत्र येऊन विकास योजनांस हातभार कां लावीत नाहींत ? प्रत्येक गोष्ट सरकारवरच ते कां सोपवितात ? परदेशी फर्म्स विरुद्ध हिंदी व्यापारीवर्ग तक्रार करतो; त्या फर्म्स भारताचें हित पहात नाहींत असें ओरडून सांगितलें जातें. कांहीं परदेशी फर्म्स तशा असतील, पण हिंदी फर्म्समध्येंहि अशा देशद्रोही फर्म्स आहेतच, कीं नाहीं ? तेव्हां, दोघांनीं एकत्र येऊन व्यापाराची नीति व कार्यक्षमता सुधारावी असा सल्ला सर जॉर्ज ह्यांनीं दिला आहे.

हिंदी उद्योगधंद्यांतील वशिलेबाजी बंद करून, लायक तरुण निवडून काढून व त्यांना योग्य शिक्षण देऊन त्यांतून कर्तबगार व्यवस्थापकवर्ग निर्माण करण्याचें अगत्य सर जॉर्ज ह्यांनीं प्रतिपादलें. सर बी. रामराव ह्यांनींहि त्यांच्या पुणें येथील भाषणांत ह्याच मुद्याचा उल्लेख केला होता. बडबड व तक्रारी कमी करा, सरकारवरच सर्व जबाबदारी टाकूं नका, तुमच्या अनुभवाचा व शक्तीचा सरकारला फायदा मिळवून द्या, वशिलेबाजी बंद करा, आर्थिक विकासाच्या कार्यांत तुमचा वांटा तुम्हीं उचला, मध्यम आकाराच्या धंद्यास मोठ्या कारखान्यांचा आधार द्या, सरकारी आणि खाजगी प्रयत्न ह्यांच्या सहकार्याची भारतास तातडीची गरज आहे, इत्यादि हितकारक गोष्टींचें विवेचन जर जॉर्ज शूस्टर ह्यांनीं करून भारतापुढील प्रश्न सोडविण्याचे कामीं योग्य मार्गदर्शन केलें आहे. इतक्या साध्या गोष्टी हिंदी उद्योगपतींना सुनवाव्या लागण्याची पाळी यावी, आणि हें काम परदेशांतील इसमानें धाडसानें पार पाडावें, हें कशाचें निदर्शक आहे ?

---

### सारस्वत को. बँकेची जमाखर्चाची वही

सारस्वत को. बँक आपल्या सभासदांस आर्थिक व्यवहारांचें इष्ट वळण लावण्याचे नमुनेदार प्रयत्न करीत असते अशाच प्रयत्नांचें उदाहरण म्हणजे बँकेनें प्रसिद्ध केलेली जमाखर्चाची वही हें होय. ह्या वहींत १९५३ चें कॅलेंडर, बँकेचा संक्षिप्त वृत्तांत आणि नोंदीसाठी कांहीं कोरी पानें हीं देण्यांत आलीं असून, जमा आणि खर्च ह्यांचे तपशील लिहितां येतील अशा रकान्यांनीं युक्त अशीं आखलेलीं पृष्ठें देण्यांत आलीं आहेत. आडव्या बाजूस, खर्चाचे पृष्ठांवर भाडें–दिवाबत्ती, दूध, किराणा, भाजी पाला, कोळसा, तेल, शिक्षण, औषध, कपडा, क्लब–सिनेमा, बँक, अशी तपशीलासाठी जागा असून उभ्या बाजूस महिन्याच्या तारखा ओळीनें लिहिलेल्या आहेत. ह्या वहीचा उपयोग केल्यानें जमाखर्च लिहिणें व त्याची छाननी करणें सोपें होईल इतकेंच नव्हे तर कोणचा खर्च जास्त होत आहे, कोठें तो कमी केला पाहिजे, उत्पन्नाशीं मेळ कसा घातला पाहिजे, इत्यादि गोष्टी तात्काळ लक्षांत येऊन योग्य ती योजना वेळीच करतां येण्यास मदत होईल. सारस्वत को. बँकेचा हा उपक्रम अत्यंत स्तुत्य आहे, ह्यांत संशय नाहीं. " पद्धतशीर जमाखर्च हीच यशाची गुरुकिल्ली " हें वहीवर छापलेलें बोधवाक्य प्रत्यक्षांत उतरविण्यास वहीचा चांगला उपयोग होईल.

### दि सेंट्रल बँक ऑफ इंडिया, लिमिटेड

दि सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. ला ३१ डिसेंबर १९५२ अखेर संपलेल्या वर्षी, गेल्या वर्षाच्या हिशेबांतून ओढलेली १७,६५,६२८ रु. १० आ. ७ पै शिल्लक धरून १,१८,२६,६०९ रु. ९ आ. ९ पै ऑडिट-पात्र नफा झाला. त्याचा विनियोग खालीलप्रमाणें डायरेक्टरांनीं केला आहे:—

खालीलप्रमाणें रकमा काढून ठेवल्या आहेत:—

| | |
|---|---|
| १२,५८,१७० शेअर्सवर ३० जून, १९५२ अखेर संपलेल्या सहामाहीसाठी करमाफ ६% म्हणजे प्रत्येक भागावर १ रु. ८ आ. ० पै प्रमाणें ॲड-इंटेरिम डिव्हिडंड | रु. १८,८७,२५५-०-० |
| बँकेच्या इनव्हेस्टमेंट्सकडे वर्ग | रु. ३५,००,०००-०-० |
| करासाठी तरतूद | रु. १०,००,०००-०-० |
| स्टाफला बोनससाठी तरतूद. | रु. १२,००,०००-०-० |
| | ७५,००,०००,-०-० |

उरलेल्या ४२,२९,२५४ रु. ९ आ. ९ पै चा विनियोग खालीलप्रमाणें करण्याची डायरेक्टरांची सूचना आहे:—

| | |
|---|---|
| १२,५८,१७० शेअर्सवर, ३१ डिसेंबर १९५२ अखेर संपलेल्या सहामाहीसाठी करमाफ ८% म्हणजे प्रत्येक भागावर २ रु. प्रमाणें फायनल डिव्हिडंड (सर्व मिळून सबंद वर्षाचें द. सा. १४% डिव्हिडंड होतें) | रु. २५,१६,२४०-०-० |
| पुढील वर्षाच्या हिशेबांत ओढण्यासाठी | रु. १७,२३,०१४-९-९ |
| | १,१८,२६,६०९-९-९ |

---

### मच्छीमारीच्या धंद्यांत टाटांची भागीदारी !

जपानी मच्छीमारीच्या धंद्याचे कांहीं प्रतिनिधी मुंबईत आले असून हिंद-जपानी सहकार्यानें मच्छीमारीच्या व्यवसायासाठी मोठी कंपनी उभारण्याबाबत ते टाटा आणि सन्सशीं वाटाघाटी करीत आहेत. जपानी उद्योगपती व टाटा ह्यांची सारख्या प्रमाणांत भागीदारी राहील. न्यू इंडिया ॲशुअरन्स कंपनीचे चेअरमन (आणि टाटा आणि सन्सचे डायरेक्टर) श्री. ए. डी. श्रॉफ हे ह्या महिनाअखेर जपानमध्यें विम्याचा धंदा वाढविण्यासाठी जात आहेत. तेथें मच्छीमारीच्या नव्या उपक्रमाबद्दल ते आणखी वाटाघाटी करतील आणि ते मुंबईस परतल्यावर अखेरचा निर्णय घेतला जाईल, असें समजतें.

---

### इंपीरिअल बँकेचे पहिले हिंदी प्रमुख

चालू वर्षी इंपीरिअल बँकेचे सध्याचे मॅनेजिंग डायरेक्टर सर रॅरिक चिशोल्म हे निवृत्त होत आहेत. त्यांचे जागीं श्री. कृष्ण हंदू ह्यांची नेमणूक करण्याचें बोर्डानें ठरविलें आहे. श्री. हंदू हे बँकेचे सर्वांत जुने हिंदी अधिकारी आहेत. त्यांनीं बँकेंत २८ वर्षे वेगवेगळीं जबाबदारीचीं कामें केलेलीं आहेत. श्री. राघवाचारी हे डेप्युटि मॅनेजिंग डायरेक्टर होतील.

---

### सांगली अर्बन को. बँकेच्या इमारतीचें उद्घाटन

अर्बन को. बँक लि., सांगलीच्या स्वतःच्या नवीन इमारतीचा उद्घाटन समारंभ २६ जानेवारी रोजीं मुंबईच्या सिडनहॅम कॉलेज ऑफ कॉमर्सचे प्रि. एस. के. मुरंजन, एम. ए., (मुंबई), बी. एस्सी., डी. एस्सी. (लंडन) ह्यांच्या हस्तें झाला.

### कोण हा आततायी विमेदार !

हंगेरीची राजधानी बुडापेस्ट येथें मायकेल डिटेन्सी नांवाचा एक माणूस रहात होता. त्यानें आपला विमा उतरलेला होता. विम्याच्या पत्रकामध्यें अशी अट होती कीं, विमेदार जर नैसर्गिक कारणांनीं मृत्यु पावला तर ५,००० पौंड देण्यांत यावे आणि अनैसर्गिक रीत्या मृत्यु पावल्यास १०,००० पौंड द्यावे. पण मायकेलवर असा कांहीं प्रसंग ओढवला कीं त्याला पैशाची ार गरज लागली. म्हणून त्यानें आपल्या दलालाला लिहिलें कीं विमापत्रांप्रमाणें मिळणारे सर्व पैशाचे हक्क आपण २,५०० पौंडांच्या रोख रकमेच्या मोबदला सोडण्यास तयार आहो; कंपनी ह्या गोष्टीला तयार झाली नाहीं तर तुम्हांला आणि कंपनीला खर्चांत पडावें लागेल आणि बराच अनपेक्षित त्रास होईल. पण दलालानें मायकेलचें पत्र हसण्यावारी घालविलें. मायकेल हा कांहीं कच्च्या दिलाचा नव्हता. कांहीं दिवस वाट पाहून त्यानें एका माणसाचा खून केला. अर्थातच त्याच्यावर खटला भरण्यांत आला. कोर्टानें त्याला दोषी ठरविलें आणि फांशीची शिक्षा सुनावली. ती रीतसर अंमलांत आणण्यांत आली आणि मायकेलला फांसावर लटकविण्यांत येऊन त्याच्या वारसांना १०,००० पौंड मिळाले. वास्तविक हा व्यवहार इथेंच संपावयाचा. पण तसें झालें नाहीं. गंमत अशी कीं, ज्या माणसाचा मायकेलनें खून केला होता त्यानेंही आपला विमा त्याच कंपनींत उतरलेला होता. अनैसर्गिक कारणानें मृत्यू आल्यास आपल्या वारसांना २०,००० पौंड मिळावे अशी अट त्यानें आपल्या विमा-पत्रकांत घालून घेतली होती. आतां खून होऊन मरण येणें म्हणजे अनैसर्गिक रीतीनें मृत्यु होणेंच असल्यामुळें, कंपनीनें खून झालेल्या माणसाच्या वारसांना २०,००० पौंड दिले, हें सांगणें नकोच. मायकेलनें कंपनीला जी धमकी दिली होती ती त्यानें नियोजनपूर्वक अंमलांत आणली, असाच एकंदर प्रकारावरून अर्थ होतो.

---

### मोठ्या बँकांस १९५२ वर्ष कसें गेलें ?

इंपीरिअल बँक वगळली, तर भारतांतील पहिल्या अनुक्रमाच्या इतर चार बँकांच्या ताळेबंदांत १९५२ मध्यें नफ्यांत घट दिसत आहे. इंपीरिअल बँकेस १९५१ मध्यें १ कोटी, २० लक्ष रु. नफा झाला होता; १९५२ मध्यें तो १ कोटी, २२ लक्ष रु. झाला. ह्या उलट, सेंट्रल बँकेच्या नफ्यांत १९५१ चें मानानें २०% घट झाली आहे, युनायटेड कमर्शिअल बँकेचा नफा १८% कमी आहे, बँक ऑफ बरोडाचा नफा १०½% नें उतरला आहे आणि बँक ऑफ इंडियाचा नफा २½% नें घटला आहे. ठेवींवरील व्याजाच्या दरांत वाढ झाली, कॉल डिपॉझिटसवर ज्यास्त व्याज द्यावें लागलें, त्यामुळें कांहीं बँकांकडील ठेवी घटल्या तरी प्रत्यक्ष दिलेलें व्याज ज्यास्त भरलें. ज्या प्रमाणांत दिलेलें व्याज वाढलें, त्या प्रमाणांत मिळालेलें व्याज वाढलें नाहीं, असें दिसतें. भारी किंमतीनें मिळवलेलें भांडवल पडून राहिलें आणि कर्जाची उलाढाल कमी झाली. सरकारी रोख्यांवर सुटणारें व्याज कायम राहिलें, पण त्या रोख्यांत गुंतविण्यासाठी मिळविलेल्या ठेवींवर व्याज ज्यास्त पडल्यामुळें दोहोंतील अनुकूल तफावत कमी उरली. व्यवस्था खर्चाचें वाढतें प्रमाण टिकूनच होतें.

---

### औरंगाबाद रेडिओ स्टेशन बंद होणार

पुणें येथें रेडिओ स्टेशन सुरू झालें म्हणजे औरंगाबाद येथील रेडिओ स्टेशन बंद करण्यांत येईल. औरंगाबाद स्टेशन चालविण्यास दरसाल ४ लक्ष रु. खर्च येतो.

# "अर्था"स आलेले संदेश

[ " अर्था " च्या १८ व्या वाढदिवसानिमित्त संपादकाकडे अनेक स्नेह्यांचे व हितचिंतकांचे संदेश आले आहेत. त्यांतील शुभेच्छांबद्दल आम्हीं त्यांचे आभारी आहों. अनुक्रमशः कांहीं संदेश येथें देत आहों. ]

"It seems but yesterday when Prof. V. G. Kale announced his intention of starting a journal in Marathi to deal mainly with economic questions. This journal has now come of age and although Prof. Kale is no more in our midst to guide it, it continues to carry on his tradition and zealously to serve the cause that was dear to his heart.

"Regionalism in the sense of a narrow outlook is deplorable, whether in politics or economics. The "Artha" has, fortunately, no such provincialism colouring its outlook. At the same time, it helps to advance the cause of economic progress for the country as a whole by focussing attention on the economic problems of Maharashtra and offering constructive suggestions for their solution.

"Questions affecting rural progress were the foremost to engage Prof. Kale's attention and their discussion figures prominently in the columns of the "Artha" to-day. And yet in view of the large place they necessarily occupy in the economic advancement of Maharashtra, I would wish the "Artha" to devote even greater attention than is done now to that aspect of the economic life of Maharashtra. As the Five Year Plan bears witness, it is our success in achieving agricultural progress that will make or mar the economic welfare of the country as a whole."

Andheri, Bombay. } Vaikunth L. Mehta

---

" आपण " अर्थ " रूपानें समाजाची जी आर्थिक बाजू सांवरण्याचा अर्थत्यागपूर्वक प्रयत्न करीत आहां त्याबद्दल आपलें अभिनंदन करतों. आपलें आतांपर्यंतचें मार्गदर्शन फार नैष्ठिक ( Conservative ) होत आहेसें मला वाटतें. सध्याच्या देशाच्या परिस्थितींत सरकारला, तसेंच जनतेला सर विश्वेश्वर अय्यांच्या शब्दांत म्हणावयाचें म्हणजे धडाडीच्या अर्थकारणाचें मार्गदर्शन हवें आहे. केवळ जनतेनें तसेंच केवळ सरकारनें धडाडी दाखवून मात्र काम भागणार नाहीं. तर उभयतांनीं सहकार्यानें धडाडी दाखवावयास हवी. तरच फलनिष्पत्ति होईल असें मला वाटतें. " अर्थाचें " वयांत आल्यानंतरचें अर्थकारण तारुण्यसुलभ धडाडीचें राहील अशी अपेक्षा आहे. "

साठे बिस्किट अँड चॉकोलेट कं. लि. पुणें २ } ग. रा. साठे

---

" आपल्या साप्ताहिकांतून सहकारी तत्त्वें व चळवळ, बँका व त्यांचे व्यवहार, कायदे तसेंच इतर सर्व प्रकारच्या आर्थिक बाबींसंबंधीं उद्बोधक शिक्षण असतें हें निर्विवाद आहे. आपल्या पत्राकडून जनतेची अशीच सेवा होवो अशी आशा व्यक्त करून पुढील वर्ष भरभराटीचें जावो हीच इच्छा. "

नगर डि. अ. सें. को. बँक लि. अहमदनगर } मो. कुं. फिरोदिया

"I have great pleasure in sending you a message on the occasion of ARTHA entering the 19th year of service to the enlightened public of India in the field of Co-operation and Banking. It is indeed gratifying that the paper founded by one of my esteemed friends, the late Prof. V. G. Kale has been continued by you in the same spirit of service with which it was founded. Many of the articles appearing in ARTHA show an enlightened and critical appreciation of many problems dealing with economics, trade and industry. I wish every success to ARTHA and hope that it will continue to progress from year to year and celebrate its Silver Jubilee in a much more ambitious manner than what can be thought of at present."

The All India Co-operative Union, Bombay. } R. G. Saraiya

---

"अर्था"नें गेलीं १८ वर्षें महाराष्ट्रीय कारखाने, उद्योगधंदे, व्यापारी कंपन्या, इत्यादींच्या चालकांस कार्यक्षमता प्राप्त करून देणारें साहित्य पुरविण्याची कामगिरी उत्कृष्ट रीतीनें पार पाडली आहे. कंपन्यांचे ताळेबंद व अहवाल ह्यांची छाननी करून सामान्य वाचकांसहि ते बोधप्रद करण्यांत " अर्था"नें यश मिळविलें आहे. त्यामुळें, आर्थिक व्यवहारांचा उलगडा करून घेण्याची इच्छा असणारांसाठी "अर्थ" हें उपयुक्त साधन झालें आहे. अशी कामगिरी करणारें मराठींतील एकमेव साप्ताहिक, ह्या दृष्टीनें तर त्याचें महत्त्व विशेष आहे. ह्या वाढदिवस प्रसंगीं " अर्था"च्या चालकांचें अभिनंदन करून त्यास दीर्घायुष्य चिंतितों."

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज, पुणें. } गो. द. आपटे

---

" अर्थ " या सुप्रसिद्ध नियतकालिकास १८ वर्षें पूर्ण झालीं त्याबद्दल आनंद व्यक्त करून संपादकांचें मी अभिनंदन करीत आहे. हिंदुस्थानच्या हिंदी अर्थशास्त्राचा पाया न्यायमूर्ति रानड्यांनीं ५०।७५ वर्षांचे पूर्वी घातला, तीच परंपरा प्रो. वा. गो. काळे यांनीं " अर्थ " हें नियतकालिक स्थापन करून चालविली व तीच सतत आजवर त्याच धोरणाला धरून चालत आलेली आहे. अर्थ या विषयाला वाहिलेलीं नियतकालिकें इतर भाषेंतून चालत आहेत. परंतु मराठींतून चालणारें हें एकमेव नियतकालिक मराठी नियतकालिकांचे सृष्टींत त्यांना भूषणभूत व आदरणीय होऊन राहिलेलें आहे. आर्थिक प्रश्नांचेबद्दल सुलभ रीतीनें ज्ञानप्रसार करण्याचें कार्य हें पत्र उत्तम प्रकारें बजावीत आहे. हें पत्र असें आहे कीं, याला उत्तरोत्तर वाढता आश्रय मिळत गेला पाहिजे व त्याची भरभराट होत गेली पाहिजे. यांत आपल्या अर्वाचीन भारताचें हित साधत राहील असा मला दृढ विश्वास वाटतो. "

लॉर्ड रे महाराष्ट्र औ. संग्रहालय पुणें २. } मा. वि. घारपुरे

"I have to say with pride that "Artha" is the only Journal in Marathi which has devoted to economic problems of the country, and the same was ushered into existence by no less famous personality than that of Prof. V. G. Kale, an economist of Inter-Provincial Reputation. I am still more proud to find that without possessing high background of your late renowned father Prof. V. G. Kale, you have shown great skill and tenacity in maintaining the old standard of the Weekly. The "Artha" has shown that there is a class of readers who could appreciate the Weekly conducted on the lines of the "Artha" which has no normally attractive features such as Stories, Poems or any romantic kind of literature. This is all the more creditable to you and I wish under your able guidance "Artha" will attain much higher status than the one at present and I wish that golden opportunity to come as early as possible."

The New Citizen Bank of India, Ltd. Bombay. } D. D. Deshpande

" अर्थाचा हा दीप लाविला विज्ञ पित्यानें महाराष्ट्रीं
पाजळता जो तन्मयतेनें अथावत सत्पुत्रानीं
दीढ तपाची पूर्ति जाहली प्रकाश देतां अशांसी,
असंढ चालो महाव्रत तुझें मिळवी महायशासि ".

ठळकवाडी } सुहृद

" अर्थाच्या वाढदिवस-प्रसंगीं त्यानें केलेल्या व तो करीत असलेल्या कामगिरीबद्दल मी धन्यवाद देतों. ईश्वरकृपेनें त्याचा उत्तरोत्तर उत्कर्ष होवो व त्याची उपयुक्तता वाढो अशी माझी प्रार्थना आहे."

केसरी कार्यालय, पुणें. } ग. वि. गोखले

"कै. प्रो. वा. गो. काळे यांनीं "अर्थ" साप्ताहिकास घालून दिलेली उच्च परंपरा व दर्जा ह्या दोन्हीं गोष्टी आपण कायम ठेविल्या आहेत त्याबद्दल धन्यवाद. ह्यापुढेंही मराठी भाषेंतील आर्थिक साहित्याचे क्षेत्रांत "अर्थ" आघाडीवर राहून मौलिक व भरीव कार्य करीत राहो अशी सदिच्छा व्यक्त करतों.

"ह्या निमित्तानें एक सूचना करावीशी वाटते, ती अशी. आपल्या साप्ताहिकांत बँकिंग, विमा, व्यापार, शेती, उद्योगधंदे, इनकमटॅक्स, सहकारी चळवळी, औद्योगिक मंडळांचे निवाडे, वगैरेविषयीं उहापोह केलेले जे लेख येतात ते एकत्रित वाचावयास मिळावेत व संदर्भासहि सोयीचें व्हावे ह्यासाठीं असे लेख विषयावारी एकत्र संकलित करून छोटी पुस्तिका प्रसिद्ध करावी."

बँक ऑफ पुना लि. पुणें. } गो. ग. साठे

"आपल्या पत्रांत वेळोवेळीं आर्थिक विषयांवर उपयुक्त लिखाण येत असतें व त्या दृष्टीनें अशा प्रकारच्या वाङ्मयांत आपण मोलाची भर घालीत आहांत. आपल्या साप्ताहिकानें आजवर केलेल्या या कार्याचें मी अभिनंदन करतों व आपली यापुढेंहि अशीच भरभराट सतत होत राहील असा विश्वास वाटतो."

सांगली बँक लि., सांगली } एम्. के. गुत्ते

"आपल्या साप्ताहिकास अठरा वर्षे पूर्ण होऊन एकोणिसावें वर्ष लागत आहे, ह्याबद्दल मी आपलें अभिनंदन करतों. बँकिंगच्या इष्ट प्रगतीसाठीं "अर्था" नें चालविलेले प्रयत्न खरोखर स्तुत्य असून, बँकांना त्याचा चांगला फायदा होत आहे, हें स्पष्ट आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितींत आपण ही बिकट कामगिरी पार पाडीत आहां, ह्याबद्दल धन्यवाद."

बेळगांव बँक लि., बेळगांव. } अ. रा. नाईक

"अठरा वर्षांतील अर्थाची कामगिरी बहुमोल होय. कारखाने, जॉइंट स्टॉक व सहकारी बँका, व इतर लिमिटेड कंपन्या व सहकारी पेढ्या, व्यक्तिगत धंदेवाले, इत्यादिकांस अर्थानें १८ वर्षांत दिलेलें मार्गदर्शन खरोखरीच उपयुक्त झालें आहे. अर्थाची उपयुक्तता वाढविण्यासाठीं आपण अर्थाचा आकार दीडपट अथवा दुप्पट केल्यास चालू अनेक बिकट प्रश्न केवळ मराठी जाणणाऱ्यास सुलभ जातील. अर्थात वर्गणी वाढविणें अपरिहार्य होय. पण वाढ कमी प्रमाणांत करावी लागेल. अधिक वाढ झाल्यास मध्यमवर्गीयांस ती देऊन अर्थाचे वर्गणीदार होतां येणार नाहीं. 'अर्था' मुळें अनेक तज्ज्ञांचे लेख मराठी वाचकांस मिळत आहेत. त्यामुळें आर्थिक व्यवसायाचें ज्ञान सुलभ रीतीनें अवगत झालें आहे. अर्थानें १८ वर्षे उपयुक्त कामगिरी केली आहे, ह्याची जाणीव ठेवून अनेक व्यक्तींनीं वर्गणीदार व्हावें. तेणेंकरून वर्गणींत थोडीशी वाढ करून पत्राचा आकार वाढवितां येईल. 'अर्थ' चिरायु होवो !"

हिंद फिनॅन्स, इंडस्ट्रीज अँड इन्व्हेस्टमेंट लि., नागपूर. } गो. आ. भोंसुले

## कै. प्रा. वा. गो. काळे यांचे पुण्यस्मृतीस सुमनांजलि

कै. प्रा. वा. गो. काळे यांचे निधनास सहा वर्षे पूर्ण झालीं. कै. काळे यांची स्मृति अद्यापहि अनेक कार्यकर्त्यांना होते याचें मुख्य कारण म्हणजे त्यांनीं आपलें जीवन शैक्षणिक, अर्थशास्त्र, औद्योगिक व सहकार विषयास वाहिलें होतें. महाराष्ट्रांतील अनेक संस्थांशीं त्यांचा निकट असा परिचय असून त्यांच्या प्रगतीस त्यांनीं फार मोठा हातभार लावला होता.

दुसऱ्या महायुद्धानंतर आपल्या देशांतील राजकीय, सामाजिक व अर्थविषयक परिस्थितीमध्यें महत्त्वाचे फरक झाले आणि त्या परिस्थितीमध्यें छापाव्यानीं फरक होत गेले. अगदीं नुकतीच आर्थिक मंदीची लाट येऊन त्यामध्यें विचाराचा असा प्रश्न उभा राहिला. अर्थविषयक व बँकिंगसंबंधीं अनेक विचारांचे प्रश्न उभे राहिले. अशा वेळीं मार्गदर्शन करणारांना कै. प्रा. वा. गो. काळे यांच्या सहकार्याची आठवण राहात असली पाहिजे. कै. वा. गो. काळे यांनीं १८ वर्षांपूर्वी चालू केलेलें अर्थ साप्ताहिक यानें किती भरीव कामगिरी केली आहे याबद्दल आलेले गौरवपर संदेश वाचून खात्री झाल्याशिवाय राहात नाहीं. स्वार्थत्यागपूर्वक आपल्या हातून समाजाची व देशाची सेवा घडावी हें व्रत त्यांनीं आमरण पत्करलें होतें व त्यामुळेंच त्यांचेबद्दल आदर व प्रेम अजूनहि कायम आहे. कै. वा. गो. काळे ज्या क्षेत्रांत काम करीत होते त्यामधील कार्यकर्त्यांना त्यांची स्मृति अद्यापहि मार्गदर्शक होईल यांत संशय नाहीं.

पुणें २७-१-५३. य. द. खोले

# दुष्काळ पीडा

## योग्य उपाय व अडचण

लेखकः—न. स. जोशी

( पृ. १५ वरून समाप्त )

खरी अडचण आहे ती क्रमांक २ अमलांत आणण्याची. कोणतीहि योजना यशस्वी होण्यास, तिच्यामागील तत्त्वें प्रथम पटलीं पाहिजेत. अर्थात् त्या योजनेबाबत शासक–संस्थेची (Government) प्रथम खात्री झाली पाहिजे व खात्री झाल्यानंतर ती कल्पना मूर्तस्वरूपांत आणण्याची तीव्र इच्छा व धमक पाहिजे. इतकें करूनहि जनमत जागृत करून व त्यांच्या सहकार्यानें व कांहीं ठराविक आंखणी (Plan) प्रमाणें ती (योजना) कृतींत उतरविली पाहिजे. चातुर्य, व्यवहार्यता व कणखरपणा ह्यांच्या साहचर्याचें उत्तम उदाहरण पाहिजे असेल तर संस्थानें विलीन करण्यांत आलीं त्यावेळेचें. तो प्रसंग होता संख्येनें अल्प पण श्रीमान संस्थानिकांशीं; हा प्रसंग त्याहिपेक्षा बांका आहे; कारण तो आहे संख्येनें फार मोठ्या व खेड्यांत अत्यंत वजन असलेल्या मध्यम व बड्या जमीनदारांशीं (मालक वा खंडकरी).

सर्व राज्यांतल्या सर्व खेड्यांत एकदम हें काम हातीं घेणें अनेक कारणांस्तव अयोग्य. त्यांचा क्रम (Priority), दुष्काळाच्या चिन्हांवरच ठरविणें अनेक दृष्टींनीं समर्थनीय; तसें केल्यानें उपरिनिर्दिष्ट अडचणींचा परिहार करणें सोपें जाईल. उदाहरणार्थ, ज्या खेड्यांत अन्नार्थी लोक आहेत व धान्य कमी आहे अशी ओरड होईल, वा तक्रार येईल तेथें हीं कोठारें प्रथम बांधणें इष्ट. ज्या गांवांत भूकबळी पडला असेल अशा गांवांत तर कोठार तावडतोब बांधावें. अशा गांवांत सर्वांनीं आपल्या मालकीचें धान्य सरकारी कोठारांत ठेवण्याचें कलमसुद्धां अत्यंत कसोशीनें अमलांत आणणेंहि योग्य ठरेल. अशी सक्ति करण्यास कायदा लागेल व कायदा करण्यास कारणेंहि सबळ पाहिजेत. तीं अशीं.

(१) गांवांत धान्य असतांना तेथें कोणीहि उपाशी नसल्याची जबाबदारी सर्व गांवांवर टाकली पाहिजे. गांवांतल्या गांवांत धान्य असतांना तेथील कोणी व्यक्ति उपाशी रहावी वा तेथें भूकबळी पडावे ही लाजिरवाणी गोष्ट होय; गांवांत धान्य कमी आहे कीं नाहीं हें नक्की ठरविण्यास अशा गांवांत सर्वांचेंच धान्य सरकारी कोठारांत ठेवण्याची सक्ति हा एकच उपाय होय. इतर कोणतेहि उपाय कुचकामाचे ठरतील.

(२) घरांत किंवा शेतावरील खोपटांत धान्य ठेवल्यानें त्यांतील सुमारें १० टक्के उंदीर–घुशींच्यामुळें वाया जातें. शिवाय त्यामुळें बिळें पडून घराची मोठी नासधूस होते. ती टाळण्यास सरकारी कोठारांत धान्य ठेवण्याची सक्ती हाच एकमेव उपाय.

(३) अशा कोठारांत धान्य ठेवलें असतां तें गांवाचे बाहेर जात नाहीं व त्यामुळें धान्य गांवांतल्या गांवांत असल्याची पूर्ण खात्री व समाधान सर्व दर्जाच्या गांवकऱ्यांस लाभेल व अनुभवानें विश्वास बसेल. कोणतीहि योजना अमलांत आणावयाची म्हटलें तर वाटेंत अडचणी असणारच. साध्या सुधारणा करावयाच्या तरी त्या असतातच. त्यांचा उहापोह येथें करण्याचें कारण नाहीं. वरील क्रमांक (१) प्रमाणें व्यवस्था अमलांत आणल्यानंतर कोणत्याही खेडेगांत धान्य कमी पडतें असें दिसल्यास, तें तावडतोब बाहेरून आणून पुरविण्याची जबाबदारीहि सरकारनेंच स्वीकारली पाहिजे, हें उघड आहे.

**खेड्यांतल्या खेड्यांत मिळूं शकणाऱ्या कामाचा प्रकार**

बिगरशेती मजुरांस काम काय यावें याबाबत निराळा लेख लिहावा लागेल, हें वर सांगितलेंच आहे. परंतु एक-दोन बाबतींत येथेंच दिग्दर्शन करणें इष्ट म्हणून तें येथें केलें आहे. काम असें पाहिजे कीं फारशी पूर्वसूचना न लागतां सरकारास तें हातीं घेतां यावें व गांवांतील अन्नार्थी इसमांस त्याकरितां गांव सोडून जावें लागूं नये. असलें सर्वांत सोपें काम म्हणजे तालींचें व रस्त्यांचें; त्याचे प्रकार दोन.

(१) समतल बांध (Contour Bunding).

(२) नाल्यावर मोठाल्या ताली (दगडाच्या व मातीच्या).

(३) गांवाच्या शिवारांतील कच्चे वा सडीचे रस्ते.

(४) गांवापासून जवळच्या मोठ्या रस्त्याला मिळणारा रस्ता.

ज्याच्या शेतांत ताल घालावयाची त्याच्याच मालकीचे दाणे कामकऱ्यांस द्यावयाचे, असा योग्य दंडक अर्थातच घालावा लागेल. त्याचप्रमाणें दुसरा दंडक असा घालावा लागेल कीं ज्यांच्या शेतांत ताली पूर्वीच घातलेल्या नाहींत व गांवांत ज्यांच्या नांवचें धान्य जास्तींत जास्त शिल्लक असेल त्यांच्या शेतीची सुधारणा करण्यास ताली वगैरे घालण्याचें काम प्रथम हातीं घ्यावयाचें. वरील इसमांच्या शेतास लागून असलेल्या इतर शेतासही समतल बांध त्याच वेळीं घालणें जरूर असतें. अशा कुटुंबाचें शेत थोडें असून त्यांचे नांवचें धान्य शिल्लक नसल्यास, सरकारी खर्चानें तें काम करून घेणें जरूर; पण तें त्याच खेड्यांतल्या मजुरांकडून. या किंवा अशाच बतींवर कांहीं नियम वा कायदे करावे लागतील. गांवच्या शिवारांतील रस्ते तसेंच गांवापासून जवळच्या मोठ्या सडकेस मिळणारा रस्ता, हींहीं गांव न सोडतां दुष्काळपीडित जनतेच्या सोईचीं कामें होत. मातीच्या धरणाचीं कामें काढलीं तरी त्यांत दुष्काळपीडितांना गांव सोडून दूर जावें लागतें हा फार मोठा दोष. अशा रीतीनें कामास दूरदेशीं गेल्यावर तेथें निवाऱ्याची जागा व इतर सोयी मिळत तरी नाहींत किंवा तशा सोई केल्यास त्यांवर खर्च होतो. गांवांतल्या गांवांत काम मिळाल्यानें खेडूत दुष्काळपीडितांची रहाण्याची गैरसोय होत नाहीं व सरकारला राहाण्याची सोय करण्याचा खर्चहि पडणार नाहीं.

बिगर–जमीन श्रमिकाला स्वतःच्या रहात्या ठिकाणीं रात्रीं परत येतां येईल अशा अंतरावर बारकें धरण किंवा कालवा असल्यास तें कामहि योग्य. मात्र काम काढावयाचें अर्धपोटी स्थानिक खेडूतांना काम व धान्य मिळावें म्हणून; पण तें द्यावयाचें ठेकेदाराला, किंवा करावयाचे यंत्रांनीं, असला प्रकार होणार नाहीं अशी खबरदारी घेणें जरूर. त्याचप्रमाणें असल्या धरणाचा प्रकल्प मंजूर करतांना नांव गरीब खेडुतांचें पण फायदा मात्र कांहीं थोड्या व्यक्तींचा असाहि प्रकार होऊं देतां कामा नये. अशा बाबतींत कोणती दक्षता घेणें जरूर त्याचा ऊहापोह येथें करतां येत नाहीं.

ह्या किंवा असल्या पद्धतीचा (Procedure) अवलंब केला म्हणजे, त्यांत ग्राम–सुधारणा व दुष्काळ–निवारणहि होईल. नियम प्रत्यक्षांत अमलांत आणतांना मुख्य अडचण आपमतलबी व्यक्ति व त्यांचे हस्तक यांचीं त्यांचा जोर कितपत चालतो व त्यावर मात करणें किती कठीण ह्याची जाणीव फारच थोड्यांना असेल. स्वार्थी व महत्त्वाकांक्षी व्यक्ति अशा वेळीं अनेक मलेवुरे उपाय अमलांत आणतात,

व अकांडतांडव करतात हा जुनाच अनुभव आहे. ह्या पूर्वानुभवावरून धडा घेतल्यास ही अवघड गोष्ट साध्य करतां येईल. कालव्यांवर १ कोटी रुपये घालून जें होणार नाहीं तें ५-१० लाख रुपयांत करण्याचा हा मार्ग आहे, हें दाखविण्यास आंकडे व तांत्रीय (Technical) निमान-पत्रकें (Estimates) यांचा आधार पाहिजे, हें मान्य. त्या धर्तीवर निबंध योग्य स्थळीं प्रसिद्ध करण्याचा प्रस्तुत लेखकाचा मानस आहे. परंतु कांहीं ठोकळ आंकडे व माहिती खालीं दिली आहे.

(अ) मुंबई राज्यांतील सर्व दुष्काळी खेड्यांत लाहोर-कोठारें बांधण्यास सुमारें ५ ते १० कोटी रुपये लागतील असा अंदाज आहे. नुसतें बंधारे बांधण्यांत आपण १ कोट रुपये खर्च केले. त्या खर्चाच्या बदला जादा धान्य-निर्मिति झाली कीं नाहीं व झाली असल्यास किती, तसेंच दुष्काळ-पीडित जनतेस तें जादा धान्य मिळण्याची व्यवस्था काय झाली त्याबाबत माहिती वा प्रत्यक्ष आंकडे उपलब्ध नाहींत. कोठारांचें निदान तसें तरी होणार नाहीं. तीं सरकारी मालकीचींच राहून प्रत्यक्ष बघावयास तरी खास मिळतील. शंकेला जागा राहणार नाहीं.

(आ) लाहोर-कोठारें एके ठिकाणाहून दुसरीकडे नेणें शक्य असतें.

(इ) वरील प्रकारांत ज्या त्या गांवांवर आपापल्या अन्नार्थी लोकांची तरतूद करण्याची जबाबदारी पडेल. लोक-शिक्षणाचा हा फारच योग्य व व्यवहार्य मार्ग !!

(ई) आपल्या खेडेगांवांत धान्य नसल्याची खोटी ओरड करण्याची सोय राहणार नाहीं. कारण लाहोर-कोठारें बांधलीं जाऊन प्रत्यक्षांत खरी परिस्थिति पडताळून बघण्याची सोय होईल.

(उ) अन्नार्थी लोकांना गांवांतल्या गांवांत काम मिळून, त्यांतून आपोआप त्याच गांवची शेती-सुधारणा होईल व त्याचा फायदा त्याच गांवांतील अन्नार्थी व इतर जनतेस मिळेल.

(ऊ) सार्वजनिक खर्च कमींत कमी लागेल.

(ए) ग्रामसुधारणेचा चांगलाच पाया घातला जाईल. एकतर उंदीर-घुशींच्या पायीं नासणारें धान्य अन्नार्थी जनतेस मिळेल व दुसरें म्हणजे उंदीर-घुशींमुळें होणारी घरांची नासधूस थांबेल. उंदीर-घुशींबरोबरच अनेक रोग येतात त्यांचाही नाश करण्याची पहिली तयारी होईल.

---

**लंडन ते न्यूयॉर्क ६० मिनिटांत!**—ब्रिटिश एअरवेज कंपनीच्या एका डायरेक्टरनें असें भविष्य वर्तविलें आहे कीं आणखी ५० वर्षांनीं लंडन ते न्यूयॉर्क हा प्रवास करण्यास विमानांना अवघीं ६० मिनिटें लागतील. ते असेंहि म्हणाले कीं सध्याच्या पिढीचीं नातवंडें ध्वनिपेक्षाहि अधिक गतीनें प्रवास करणाऱ्या विमानांतून प्रवास करतील. ह्या विमानांत ५०० माणसें बसू शकतील आणि भाडें मात्र सध्याच्या तिसऱ्या वर्गाच्या रेल्वे प्रवासाचें असेल.

**पेप्सू राज्यांत विटांवर कर**—पेप्सू राज्यांत विटांच्या उत्पादनावर दर हजारीं ८ आणे कर बसविण्यांत आला आहे असें समजतें. हा कर तावडतोब रद्द करण्यांत यावा म्हणून विटांच्या भट्टयांचे ४०० मालक मुख्यमंत्री ह्यांना नुकतेच भेटले. अशा प्रकारचा कर भारतांत फक्त ह्याच राज्यांत आहे.

**ब्रिटनमधील अपघात**—गेल्या वर्षी ब्रिटनमध्यें रस्त्यांवर झालेल्या अपघातांत ४,७०५ माणसें दगावलीं आणि ५०,२७१ जबर जखमी झालीं, अशी माहिती प्रकट करण्यांत आली आहे.

१९५० अखेरचें ११ वें यशस्वी मूल्यमापन

१९५० मध्येंही रु. २६५ लाखांवर नवीन विम्याचें पूर्ण काम.

वेस्टर्न इंडिया

विमा कंपनीनें

आपलें सामर्थ्य, स्थैर्य व सेवा

यासंबंधीची प्रचिती पुन्हां एकवार विमा जगतास आणून दिली आहे.

दर हजारी त्रैवार्षिक बोनस

हयातींतील पॉलिसी — रु. २७ हयातीनंतरची पॉलिसी — रु. ३३

कंपनीच्या वाढत्या वैभवांत सहभागी व्हा व सर्वोत्कृष्ट फायद्यासाठी वेस्टर्न इंडियाची निवड करा.

के. वाय. जोशी, बी. ए., एफ. आय. ए.
मॅनेजर

वेस्टर्न इंडिया लाईफ
इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा.

शाखा कचेरीः— शहर: १७९ बुधवार पेठ, लक्ष्मीरोड, पुणे. कँप: केअर-ऑफ ब्रेसवेल्स ईस्ट स्ट्रीट, पुणे-१
फोन नंबर— ३४०२

दि सांगली बँक लिमिटेड

सांगली

(स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक)

मुख्य ऑफिस : सांगली

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रुपये १०,००,००० |
| वसूल भांडवल | रुपये ४,५०,००० |
| रिझर्व व फंडस् | रुपये ४,५०,००० |
| वर्किंग फंडस् | रुपये एक कोटी |

: शाखा :

मुंबई, शहापूर, तेरदळ, रबकवी, शिरहट्टी, मंगळवेढें, कवठें, कराड, उगार, विलिंग्डन कॉलेज.

सांगली येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टची व्यवस्था आहे. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. एस्. ई. सुखटणकर, D. F. C., I. A. S. (चेअरमन) कलेक्टर, साउथ सातारा.

(१) श्री. नेमचंद रावजी शहा (२) श्री. भूपालराव अनंत आरवाडे (३) श्री. पुरुषोत्तम गोकुळदास, (४) श्री. गुंडप्पा बाबाजी आरवाडे, (५) श्री. शांतीनाथ बाबुराव आरवाडे, B. A., (६) श्री. मारुतीराव रामचंद्र जाधव.

एम्. के. गुप्ते,
एम्. ए., सी. ए. आय. आय. बी.
मॅनेजर

हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.